# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

### भूगोल विभाग

प्रभात पुणे, मंगळवार, दि. १९ फेब्रुवारी २०१९



राजगुरूनगर : येथे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात भूगोल विभागात विद्यार्थ्यांना सर्वेक्षणासंदर्भातील प्रात्यक्षिक करून दाखवले.

## राजगुरूनगरमध्ये विद्यार्थ्यांना अद्ययावत सर्वेक्षणाचे धडे

राजगुरूनगर, दि. १८ (प्रतिनिधी) - हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल विभागात विद्यार्थ्यांना सर्वेक्षणासंदर्भातील अद्ययावत तंत्रज्ञानाने तयार केलेल्या टोटल स्टेशन सर्वेक्षण या उपकरणाबद्दल माहिती व्हावी, या उद्देशाने एकदिवसीय सर्वेक्षणविषयक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेमध्ये राजवीर एंटरप्रायजेसचे मृगेंद्र सांडभोर, विकी सातकर आणि सिव्हिल इंजिनीअर मयूर गाडे या सर्वेक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांसह भूगोल विभागातील विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी झाले होते.

यावेळी बोलताना राजवीर एंटरप्रायजेसचे मृगेंद्र सांडभोर यांनी सर्वेक्षण क्षेत्रामध्ये असलेल्या संधीची माहिती विद्यार्थ्यांना दिली. औद्योगिक, शेतजमीन, गावठाण, बांधकाम आदी क्षेत्राचे मोजणीचे कामकाज नियमित सुरू असते. त्यामुळे सर्वेक्षण क्षेत्रातील कामाचे स्वरूप व्यापक असून यात रोजगाराच्या खूप संधी उपलब्ध आहेत. या यंत्राच्या साह्याने कमी वेळेत कमी श्रमात बिनचूक मोजणी केली जाते असे ते म्हणाले. त्यांनी टोटल स्टेशन सर्व्हे या उपकरणाच्या साह्याने सर्वेक्षण केल्यानंतर ऑटो कॅडमध्ये पोस्ट प्रोसेसिंग करण्याच्या संदर्भात विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करून दाखविले.

विकी सातकर यांनी सरकारी मोजणी आणि खासगी मोजणी प्रक्रिया, मोजणी करण्याची पद्धती, मोजणी करताना केल्या जाणाऱ्या कृती, तसेच आधुनिक तंत्रज्ञानाची सर्वेक्षणामधील भूमिका या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. तर सिव्हिल इंजिनीअर असलेल्या मयूर गाडे यांनी बांधकाम क्षेत्रामधील सर्वेक्षणाच्या संधी आणि टोटल स्टेशन सर्वेक्षण उपकरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे प्रश्न विचारून सर्वेक्षण क्षेत्रातील व्यावसायिक संधीची माहिती करून घेतली. या कार्यक्रमाचे नियोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, भूगोल विभाग प्रमुख प्रा. दिलीप मुळूक, प्रा. एम. एल. मुळूक, प्रा. डी. एम. मारकड यांनी केले.

# राजगुरू महाविद्यालयात कार्यशाळा

राजगुरुनगर : प्रतिनिधी

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल विभागातील विद्यार्थ्यांना टोटल स्टेशन सर्वेक्षण या उपकरणाबद्दल माहिती व्हावी, या उद्देशाने एकदिवसीय सर्वेक्षणविषयक कार्यशाळा घेण्यात आली. यात राजवीर एंटरप्रायझेसचे मृगेंद्र सांडभोर, विकी सातकर आणि मयूर गाडे या सर्वेक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांसह भूगोल विभागातील विद्यार्थी सहभागी झाले होते.



टोटल स्टेशन सर्वेक्षणबद्दल माहिती घेताना विद्यार्थी.

राजवीर एंटरप्रायझेसचे मृगेंद्र सांडभोर यांनी सर्वेक्षण क्षेत्रात असलेल्या संधींची माहिती विद्यार्थ्यांना दिली. औद्योगिक, शेतजमीन, गावठाण, बांधकाम आदी क्षेत्रांचे मोजणीचे काम नियमित सुरू असते; त्यामुळे सर्वेक्षण क्षेत्रातील कामाचे स्वरूप व्यापक असून, त्यात रोजगाराच्या खूप संधी उपलब्ध आहेत. या यंत्राच्या साह्याने कमी वेळेत व कमी श्रमात बिनचूक मोजणी केली जाते, असे ते म्हणाले. त्यांनी टोटल स्टेशन सर्व्हे या उपकरणाच्या साह्याने सर्वेक्षण केल्यानंतर ऑटो कॅडमध्ये पोस्ट प्रोसेसिंग करण्याच्या संदर्भात प्रात्यक्षिक करून दाखविले.

विकी सातकर यांनी सरकारी मोजणी आणि खासगी मोजणी प्रक्रिया, मोजणी करण्याची पद्धत, मोजणी करताना केल्या जाणाऱ्या कृती; तसेच आधुनिक तंत्रज्ञानाची सर्वेक्षणामधील भूमिका या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले.

सिव्हिल इंजिनीअर मयूर गाडे यांनी बांधकाम क्षेत्रामधील सर्वेक्षणाच्या संधी आणि टोटल स्टेशन सर्वेक्षण उपकरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे प्रश्न विचारून सर्वेक्षण क्षेत्रातील व्यावसायिक संधींची माहिती करून घेतली. याचे नियोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, भूगोल विभागप्रमुख प्रा. दिलीप मुळुक, प्रा. एम. एल. मुळुक, प्रा. डी. एम. मारकड यांनी केले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख